# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- दिनांक. २०.०४.२०२०

वाचाः- १) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश, दिनांक १३.०४.२०२०

२) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश, दिनांक १५.०४.२०२० व दिनांक १९.४.२०२०

३) साथरोग प्रतिबंध कायदा १८९७

४) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५.

५) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचनाक्र. करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य -५ दि.१४ मार्च,२०२०.

६) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दिनांक २५.०३.२०२०, दिनांक १५.०४.२०२०, दिनांक १७.०४.२०२० व दि.१८.०४.२०२०

**विषयः कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत.( नांदेड जिल्हयात फौजदारी प्रक्रिया दंड संहीतेचे कलम १४४ ची मुदत (दि. २०.०४.२०२० ते दि.०३ मे २०२० पर्यंत)**

## शुध्दीपत्रक

ज्याअर्थी, या कार्यालयाचे संदर्भीय क्रं. ०१ वरील आदेशानूसार जिल्हयात मनाई आदेश दिनांक १४ एप्रिल, २०२० रोजी ००.०० वा. पासुन ते दिनांक ३० एप्रिल २०२० रोजी मध्यरात्री २४.०० वा. पर्यंत ग्रामीण, नागरी व औद्योगिक क्षेत्रात जमावबंदी आदेश, नियमावली आणि उपाययोजनासह लागू करण्यात आले होते.संदर्भ २ वरील आदेशानूसार सदर कालावधी ३ मे २०२० पर्यंत वाढविण्यात आला.

आणि ज्याअर्थी, नागरिकांची गैरसोय होवू नये म्हणून आदेशात नमूद काही खाजगी दुकाने व आस्थापना चालु ठेवण्यास मुभा देण्यात आली आहे. नांदेड जिल्हयात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आतापर्यंत केलेल्या उपाययोजनाच्या अनुषंगाने सदर विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यास यश प्राप्त झाले आहे.

तथापि, यापूढेही सदर विषाणूचा प्रादुर्भाव नांदेड जिल्हयात रोखण्याच्या अनुषंगाने खबरदारीचा उपाय म्हणून मी डॉ. विपीन इटनकर,भा.प्र.से. जिल्हादंडाधिकारी नांदेड, मला संदर्भ क्रं. ५ नूसार कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्यास सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. त्या अधिकाराचा वापर करुन या कार्यालयाचे संदर्भिय आदेश क्रं १ व २ मध्ये नमूद शासकीय, निमशासकीय आस्थापना, अत्यावश्यक वैद्यकीय सेवा देणारी आस्थापना व त्यांच्याशी निगडीत दुकाने वगळता ईतर सर्व आस्थापना, दुकाने **(केवळ अशा आस्थापना, दुकाने ज्यांना संदर्भीय आदेश क्र.०१ व ०२ नुसार चालू ठेवण्यास मुभा देण्यात आलेली आहे )** हे केवळ **सकाळी ७.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत** चालू राहतील असे याव्दारे आदेशित करीत आहे.

Darade PC CORONA

Scanned with CamScanner

**जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.**

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

सदरील आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती,संस्था अथवा समुह यांनी साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

हे आदेश दि. २०.०४.२०२० रोजी माझे सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.

स्वा/-

**(डॉ.विपीन इटनकर)**मा.प्र.से.

**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**

**<u>प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर</u>**

१. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

**<u>प्रतिलीपी - आवश्यक कार्यवाहीस्तव</u>**

३. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
४. पोलीस अधिक्षक, नांदेड
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
६. सर्व उपविभागीय दंडाधिकारी नांदेड जिल्हा
७. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
८. सर्व तालुका दंडाधिकारी नांदेड जिल्हा
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड
१०.जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड.
११.व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड
१२.अधिष्ठाता,डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णूपूरी नांदेड
१३.अधिष्ठाता,शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय नांदेड.
१४.इंन्डीयन डेन्टल ऑसोसिएशन नांदेड.
१५.सहायक कामगार आयुक्त, नांदेड
१६.जिल्हा माहीती अधिकारी नांदेड
१७.केंद्र संचालक आकाशवाणीकेंद्र नांदेड यांना प्रसिध्दीस्तव.

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED Dist.

**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**

Darade PC CORONA

Scanned with CamScanner